# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

प्रो. (डॉ.) सदानंद भोसले

एम्.ए., पीएच् डी.

**संचालक** (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१


संदर्भ : रासेयो/२०२४–२५/०५      दि. १०/०४/२०२४

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जंयती निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करणेबाबत

संदर्भ : क्र.:उशिसं/मवि–१/परिपत्रक/२०२४/२१२६, दिनांक ४ एप्रिल २०२४ चे पत्र

महोदय,

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून ओळखले जातात. भारतीय लोकशाही व्यवस्थेची पायाभरणी करण्याबरोबरच त्यांनी सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक दृष्टया मौलिक असे योगदान भारतीय समाजाला दिले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीयांचे प्रेरणास्थान आहे. त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आणि आधुनिक भारत घडविण्यासाठी त्यांनी केलेल्या संघर्षाची समाजाला व विशेष:त शिक्षण क्षेत्रातील विद्यार्थी व शिक्षकांना प्रेरणा मिळावी यासाठी शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या पत्रानुसार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याशी संबंधित विषयांवर परिसंवाद, त्यांच्या विचारधारांवर आधारित ग्रंथोत्सव, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा तसेच त्यांच्या कार्याशी संबंधित इतर नाविण्यपूर्ण उपक्रम/कार्यक्रम इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन दि. १४ एप्रिल २०२४ पूर्वी करण्यात यावे.

सदर उपक्रमाचे रासेयो एककामार्फत यशस्वी आयोजन आपल्या महाविद्यालयात करून, उपक्रम आयोजनानंतर त्वरीत उपक्रमाचा अहवाल व छायाचित्रे nss_student_list@pun.unipune.acin या मेलवर (विषय: डॉ. बाबासाहेब आंबेडकर जंयती उपक्रम याविषयासह) पाठवावा. कळावे, ही विनंती.

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना

| महाविद्यालयाचे नाव : | | | |
|---|---|---|---|
| रासेयो कोड : | | | |
| क्र | उपक्रम दिनांक | उपक्रम राबविण्यात आलेले विषय | सहभागी विद्यार्थी संख्या |
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण).
४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर ४११०१६.

Web : www.dhepune .gov. in E-Mail :mavi. dhepune@gov.in

फोन नं.020/26122119,26051512,26130627,26124639 फॅक्स नं. 020/26111153.


क्र.: उशिसं/मवि-१/परिपत्रक/२०२४/ 2926 दिनांक: .२०२४

- 4 APR 2024

**विषय : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करणेबाबत..**

संदर्भ: शासन परिपत्रक क्रमांक: संकीर्ण १११९/प्र.क्र. ११५/१५/समन्वय, दि. २२.१२.२०१५

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून ओळखले जातात. भारतीय लोकशाही व्यवस्थेची पायाभरणी करण्याबरोबरच त्यांनी सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक दृष्टया मौलीक असे योगदान भारतीय समाजाला दिले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीयांचे प्रेरणास्थान आहे. त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आणि आधुनिक भारत घडविण्यासाठी त्यांनी केलेल्या संघर्षाची समाजाला व विशेषत: शिक्षण क्षेत्रातील विद्यार्थी व शिक्षकांना प्रेरणा मिळावी यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याशी संबंधित विषयांवर परिसंवाद, त्यांच्या विचारधारांवर आधारित ग्रंथोत्सव, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा तसेच त्यांच्या कार्याशी संबंधित इतर नाविण्यपूर्ण उपक्रम/कार्यक्रम इ. कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे.

विद्यापीठे/महाविद्यालये यांनी आयोजित केलेल्या उपक्रमांच्या अनुषंगाने सविस्तर अहवाल विभागीय सहसंचालक कार्यालयामार्फत संचालनालयास सादर करावा.

**(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)**
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे -१६.

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
२. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे/अभिमत विद्यापीठे/स्वयंअर्थसहायित विद्यापीठे - महाराष्ट्र राज्य.
३. प्राचार्य / संचालक, सर्व शासकीय/अशासकीय महाविद्यालये/संस्था.

प्रत माहितीस्तव - मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.